# सं पा द की य

## अविरत अटकसत्र

भारताच्या राज्यघटनेतील कलम १९(१)(अ)नुसार भारतातील सर्व व्यक्तींना अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळाले आहे, याचा पुनरुच्चार आपण सातत्याने करत असतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्यामध्ये तुमचा विचार, तुमचे मत मांडण्याचा, आदान प्रदान करण्याचा तुम्हाला अधिकार आहे. किंबहुना सशक्त लोकशाहीचा तो मूलभूत पाया आहे. विभिन्न विचार व्यक्त करणे, माहिती ज्ञान सर्वांपर्यंत पोहोचवणे, वेगवेगळ्या मतांचा आदर करणे, आपले वेगळे मत व्यक्त करणे हे लोकशाहीला अभिप्रेत आहे. समाज निकोप, निरोगी, सुदृढ व समृद्ध असल्याचे ते व्यवच्छेदक लक्षण आहे. अभिव्यक्ती बोलण्यातून, भाषणातून, विविध कलांमधून मग त्यामध्ये साहित्य आहे, वैचारिक लेखन आहे, चित्रांमध्ये व्यंगचित्रे, उपहासात्मक चित्रे आहेत, गाणी, कविता यांचाही समावेश आहे, उपहासात्मक बोलणे आहे, एखाद्या व्यक्तीच्या व्यंगावर निरोगी विनोद करणे, हेही अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. पण अभिव्यक्ती स्वातंत्र्याबद्दल चुकीचा अन्वयार्थही काढला जातो : ट्रोल करणे, शिवराळ भाषा बोलणे, खोटे बोलणे (परत परत खोटे बोलले की, ते खरे वाटते असं सांगणे), विकृत, बीभत्स बोलणे हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाही. अभिव्यक्ती सभ्य व नैतिक असली पाहिजे. नियम पायदळी तुडवणे अभिव्यक्ती स्वातंत्र्यामध्ये बसत नाही. पण हा फरक लक्षात घेण्याची तर्कनिष्ठता सरकारी यंत्रणेमध्ये आढळत नाही.

२५ जून रोजी अहमदाबाद मेट्रोपोलिटन कोर्टाच्या आदेशानुसार गुजरात ए. टी. एस.ने मानवाधिकार व सामाजिक कार्यकर्त्या तिस्ता सेटलवाड यांना त्यांच्या जुहू येथील घरातून अटक केली. आजतागायत त्या तुरुंगात आहेत. अलीकडेच २००२च्या गुजरात दंगलींच्या आरोपातून नरेंद्र मोदी व ६३ लोकांची निर्दोष मुक्तता सर्वोच्च न्यायालयाने केली. त्यानंतर लगेचच ही अटक झाली आहे. अहमदाबाद येथील गुलमर्ग सोसायटीत काँग्रेसचे माजी खासदार अहसान जाफरी यांच्यासह ६९ जणांचा मृत्यू झाला होता. जाफरीच्या पत्नी झकिया जाफरी या हत्याकांडाच्या प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. त्यांनी या निर्दोष मुक्ततेला आव्हान देणारी याचिका सादर केली होती. त्यांच्या या कायदेशीर लढाईत तिस्ता सेटलवाड सहयाचिकाकर्त्या आहेत. गुजरातच्या अहमदाबाद पोलिसांच्या गुन्हा शाखा राज्याचे माजी महासंचालक आर. बी. श्रीकुमार यांनाही अटक झाली आहे. गुजरातचे माजी आय. पी. एस. संजीव भट्ट हेही अटकेत आहेत. तिस्ता सेटलवाड यांना अटक झाल्यानंतर पुणे, मुंबई, दिल्ली येथे निदर्शने झाली. तिस्ता सेटलवाड यांनी अथकपणे गुजरात हत्याकांडासंदर्भात अभ्यास केला आहे, संशोधन केले आहे, पुरावे जमा केले आहेत. त्यांच्या या कामगिरीची दखल 'न्यूयॉर्क टाइम्स', 'वॉशिंग्टन पोस्ट' यांनीही घेतली आहे. तिस्ता सेटलवाड यांना मुंबईत ताब्यात घेतल्यानंतर गुजरात दहशतवादी विरोधी पथकाने त्यांना अहमदाबाद गुन्हा शाखेच्या ताब्यात दिले.

तिस्ता सेटलवाड 'सिटीजन फॉर जस्टिस अँड पीस'

या स्वयंसेवी संस्थेच्या सचिव आहेत. खोटी तथ्ये मांडण्याचा, साक्षीदारावर प्रभाव पाडल्याचा, कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापर केल्याचा व कुणा पटेल यांच्याकडून २५ लाख रुपये घेतल्याचा आरोप तिस्तांवर ठेवण्यात आले आहेत. अहमदाबाद येथील न्यायालयात त्यांना हजर करण्यात आले. तिस्ता सेटलवाड यांच्यासह भारतीय पोलीस सेवा आय. पी. एस. अधिकारी आर. बी. श्रीकुमार व संजीव भट्ट यांना खोटे कट करणे, कायदेशीर कारवाईत अडथळा आणणे या खोट्या आरोपाखाली एफ. आय. आर. दाखल करून अटक केले आहे.

२४ मार्च २०१८ रोजी 'किसी से ना कहना' या ऋषिकेश मुखर्जी यांच्या हिंदी चित्रपटातील एक दृश्य फोटो रूपात खोट्या बातम्यांचा सातत्याने पर्दाफाश करणारे मोहम्मद जुबेर यांनी ट्विट केले होते. या फोटोत हॉटेलचे नाव 'हनिमून-टू-हनुमान हॉटेल' असे होते, त्यात त्यांनी २०१४पूर्वी हनिमून, २०१४नंतर हनुमान असे उपहासात्मक ट्विट केले होते. 'अल्ट न्यूज'चे सहसंपादक असलेल्या जुबेर यांना दुसऱ्या एका ट्विट अकाउंटवरच्या तक्रारीवरून अटक करण्यात आली होती. जुबेर धार्मिक तेढ निर्माण करतात व हनुमान भगवान हे ब्रह्मचारी असून त्यांचा संबंध हनिमूनशी जोडला असून हा हिंदूंचा अपमान आहे अशी तक्रार करण्यात आली होती. दिल्ली पोलिसांनी २०१८पासून असणाऱ्या जुबेर यांच्या ट्विटवर निनावी ट्विटरवरून आलेल्या तक्रारीच्या आधारे त्यांना तात्काळ अटक केली होती. जुबेर यांच्या अटकेनंतर हे अकाउंट उडवले गेले, जुबेर संबंधित ट्विटही डिलीट करण्यात आले. तरीही आयपीसी १५३ आ व २९५ अ कलमाखाली जुबेर यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली गेली. धार्मिक विद्वेष पसरवणे असा आरोप करून ही अटक झाली होती. उत्तर प्रदेश पोलिसांनी जुबेर यांच्यावर झालेल्या सहा फिर्यादी सर्वोच्च न्यायालयात दाखल केल्या होत्या. उत्तर प्रदेश सरकारने जुबेर यांना ट्विट करण्यास मनाई करावी असेही न्यायालयाला सांगितले होते. पण न्यायमूर्ती जांगला यांनी जुबेर यांचा जामीन मंजूर केला व पोलिसांच्या कारवाईवर टीकाटिप्पणीही केली. ट्विट करण्यास मनाई करा, असे सांगता येणार नाही. जुबेर काहीही करण्यास स्वतंत्र आहेत. त्यांना लिहू नका असे सांगू शकत नाही, फक्त त्यांनी आपली कृती कायद्याच्या कक्षेत करावी, असे न्यायालयाने सांगितले. राजकीय पक्षाच्या धोरणावर टीका होतच असतात, त्यामुळे या टीकेवर अशी कलमे लावणे योग्य नाही असेही न्यायमूर्ती जांगला यांनी खडसावले. यावेळी त्यांनी लोकशाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, मुक्त समाज यावर परखड मत व्यक्त केले. २०१७पासून 'आल्ट न्यूज' चालू आहे. जगातील महत्त्वाच्या प्रमुख माध्यमातील एक अशी त्याची नोंद आहे. त्याचे संस्थापक आणि अनेक सहकारी हेही गेली अनेक वर्षे पोलीस व उजव्या विचारसरणीच्या लोकांचा ससेमिरा सहन करत आहेत. डिजिटल माध्यमांमध्ये प्रसारित झालेल्या बातम्यांची तथ्य पडताळणी करून वास्तवता पुढे आणणारे पत्रकार म्हणून मोहम्मद जुबेर यांची ख्याती आहे.

मोहम्मद जुबेर, तिस्ता सेटलवाड सांसारख्या समाजातील विचारी, ज्ञानी, प्रगल्भ लोकांवर कारवाई करून यंत्रणा समाजात एक दहशत पसरवत आहे. विचार स्वातंत्र्य घेऊन मतप्रदर्शन कराल तर तुमचीही गत अशीच होईल अशी घबराट निर्माण करणारे दबाव तंत्र वापरले जाते आहे. सर्वसामान्य या दबावाला बळी पडत आहेत. साहजिकच काय बोलायचे व कोणाशी बोलायचे हा मध्यमवर्गीय सावधपणा सर्वसामान्यांत झिरपत आहे. आज तरी या असह्य स्तब्धतेची कोंडी फुटण्याची प्रतीक्षा आहे.

●

**वृषाली मगदूम**
मराठीच्या निवृत्त प्राध्यापक, कार्यकर्त्या, नवी मुंबई
vamagdum@gmail.com